वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि. १८ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# बीडमध्ये सामाजिक गणित मांडत नगराध्यक्षपदाच्या उमेदवाऱ्या!

## नगराध्यक्षपदासाठी सोशल इंजिनिअरिंगचा वापर, जातीय समिकरण निर्णायक

Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com

### नगर पालिकेवर सत्ता काबीज करण्यासाठी प्रत्येक पक्षाची जुळवाजुळव सुरू

बीडमध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीवर सर्व पक्षांकडून सोशल इंजिनिअरिंगचा मोठा वापर होत असून जातीय समीकरणे सर्वात मोठा निर्णायक घटक ठरत आहेत.विविध समाजसमूहांच्या मताधिक्यावर आधारित उमेदवारांची चाचपणी सुरू असल्याने पक्षांतर्गत नाराजी आणि अंतर्गत स्पर्धा वाढली आहे.नगरपालिकेच्या सत्तेवर कब्जा मिळवण्यासाठी प्रत्येक पक्ष मतदारधार, जातीय संतुलन आणि स्थानिक नेत्यांचा प्रभाव या तिन्ही गोष्टींची जुळवाजुळव करत आहे. ▶▶ पान २ वर

### डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे



येथील प्रसिद्ध कान,नाक, घसा तज्ञ डॉ.रविंद्र घुंबरे यांच्या ज्योती घुंबरे या पत्नी आहेत. डॉ.रविंद्र घुंबरे यांचे वडील मिल्ट्रीमध्ये सर्व्हिसला होते. दोन्ही डॉक्टर गेल्या अनेक वर्षापासून बीडमध्ये रुग्ण सेवा करीत आहेत. पहिल्यांदाच त्या राजकारणात प्रवेश करत आहेत. भारतीय जनता पक्षाने नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून त्यांची उमेदवारी सोमवारी दाखल केली.

### सौ.स्मिता विष्णू वाघमारे



बीड शहरात अनेक वर्षे नगर सेवक म्हणून विष्णू वाघमारे यांचे सामाजिक कार्य आहे. स्मिताताई वाघमारे या ही नगर सेविका आणि उपनगराध्यक्ष म्हणून बीड नगर पालिकेत त्यांनी चांगली कामगिरी केलेली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे. नगर पालिकेच्या राजकारणात वाघमारे कुटुंबिय दीर्घकाळापासून असल्यामुळे त्यांच्याकडे अनुभव मोठा आहे.

### श्रीमती प्रेमलता पारवे



अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून घड्याळ या चिन्हावर श्रीमती प्रेमलता पारवे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. श्रीमती पारवे या महसुल खात्यामध्ये नायब तहसिलदार या पदावरुन निवृत्त झालेल्या आहेत. सामाजिक कार्यात त्या अग्रेसर असतात. दलित मित्र स्व.मनोहरदादा वंजारे यांच्या त्या कन्या आहेत. राष्ट्रवादीच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

### डॉ. सारिका क्षीरसागर, मनिषा आगे, विमल मुळूक यांच्यात लढत





बीडमध्ये प्रभाग क्र.१५ 'अ' मध्ये भाजपाच्या डॉ. सारिका क्षीरसागर विरुध्द तुतारीच्या मनिषा महादेव आगे अशी लढत होत आहे. मनिषा आगे ह्या तुतारी गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या बहीण आहेत. त्या चाणक्यपुरी भागात राहतात. याच प्रभागातून राष्ट्रवादीच्या घड्याळ चिन्हावर विमल रोहीदास मुळूक ह्या देखील निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे प्रभाग १५ मधील लढत प्रचंड लक्षवेधी असणार आहे.

### अमर नाईकवाडे विरोधात अमृत सारडा





प्रभाग ३ 'ब' मधून घड्याळीचे अमर नाईकवाडे यांच्या विरोधात भाजपाकडून अमृत सारडा यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर तुतारीकडून रवि जयमल्हार बागल यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्याच ठिकाणी भाजपाने अमृत सारडा असा तगडा उमेदवार मैदानात उतरवलेला आहे. त्यामुळे या लढतीकडे देखील लक्ष लागले आहे.

### चार ठिकाणी तुतारीला उमेदवार नाही?

बीडमध्ये ५२ नगरसेवकांसाठी निवडणूक होत आहे. मात्र तुतारी गटाकडून प्रभाग ३ 'अ', प्रभाग ८ 'ब', प्रभाग १४ 'अ' प्रभाग १९ 'ब', मध्ये पक्ष उमेदवार मिळाल्याचे दिसत नाही. मात्र हा पॉलीसीच भाग आहे की अजून काही हे समजण्यासाठी दोन दिवस जावू द्यावे लागणार आहेत.

## प्रभाग क्रं. १६ अन् १७ मधून एमआयएमच्या उमेदवारांचे अर्ज अवैध

प्रभाग क्रं. १६ मधून फारूक पटेल, नसीम इनामदार, साजन चौधरी, अक्रम बागवान, शेख जमील यांचे अर्ज वैध राहिले, आता चुरस वाढणार

# दलित मित्राच्या लेकीला राष्ट्रवादी नगराध्यक्ष करणार

## माजी आ.अमरसिंह पंडित यांचा विश्वास

### स्व.मनोहरदादा वंजारे यांची कन्या प्रेमलता पारवेंसह ५२ उमेदवारांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचे आवाहन



बीड,(दिव्य न्युज) :- गेली तीन दिवस उमेदवाराच्या निवडीबद्दल वैचारीक, सामाजिक व राजकीय अभिसरण साधले जात असताना राष्ट्रवादी पक्षाकडून उमेदवार कोण ? या प्रश्नाचे उत्तर काल समोर आले. राष्ट्रवादीचे सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी दलित मित्र माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहरराव वंजारे यांच्या कन्या निवृत्त नायब तहसिलदार प्रेमलता पारवे यांची उमेदवारीव सौ.अंजुश्री महेश मोटे यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

गेवराई नगर परिषद निवडणुकीमध्ये आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे यांच्यासह सर्व उमेदवारांनी शक्ति प्रदर्शन करत प्रचार रॅली काढली. राष्ट्रवादीचे युवा नेते रणवीर पंडित यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून उपस्थित मतदारांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, माजी नगराध्यक्ष तथा उमेदवार महेश दाभाडे, श्रावणबाळ योजनेचे तालुकाध्यक्ष दादासाहेब घोडके, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते बंडू मोटे, महेश मोटे, विशाल ठाकूर, बाबुराव बेद्रे, समाधान मस्के, अभिषेक गायकवाड, माऊली पंडित, ज्ञानेशर दाभाडे, सोनू दाभाडे, अदित्य दाभाडे, रघुनाथ आतकरे, मनोज हजारे, सुभाष घुंबार्डे, ललित घुंबार्डे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्षा सौ.मुक्ता आर्दड यांच्यासह पल्लवी गोगुले, योगीता तांबारे, शिला पैठणे, अलका गायकवाड, संगीता घोडके, नीता बेद्रे, भावना जैन, गीता बेद्रे, कालिंदा कातकर, प्रिती दाभाडे, सविता मोटे, संध्या येवले, सिमा जवंजाळ, नीता डरपे, दिपाली लाटे, आरती गायकवाड, त्रिवेणी मुळे, अमृता गायकवाड, भावना लवाडे, शोभा औटी, सिमा होंडे यांच्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आम्ही प्रामाणिक आणि सक्षम मित्र निवडला-अनिल जगताप



आमच्याकडे भाजपचा देखील प्रस्ताव होता मात्र मतदारांच्या समोर मते मागताना प्रामाणिकता आणि सक्षम मित्र असेल तरच आम्ही निवडून येऊ शकतो असा आमचा विशास आहे. अशाप्रकारे आम्ही उपमुख्यमंत्री आमचे नेते ना.एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रस्ताव पाठवला आणि त्यांच्या आदेशाने राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यासोबत जाण्याचे नक्की केले असे जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप यांनी पत्रकारांना सांगितले.

### आजवर क्षीरसागरांनी शहर लुटले आता विकासासाठी राष्ट्रवादी सोबत-कोलंगडे



स्व.लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी क्षीरसागरांच्या हुकूमशाहीच्या विरोधात लोकशाहीत लढा दिला. शहर क्षीरसागरांनी अळीपाळीने लुटून खाल्ले, आता मात्र आम्ही असे होवू देणार नाही. राष्ट्रवादी सोबत खांद्याला खांदा लावून निवडणुक लढवणार आणि जिंकणार असे शिवसंग्रमचे राज्यकार्यवाह प्रभाकर कोलंगडे यांनी म्हटले.

## बीड नगराध्यक्ष पदासाठी ४३ अर्ज वैध तर ४ अर्ज बाद!

### नगरसेवक पदांसाठी २६ प्रभागांमधील ७७४ अर्जांची छानणी सुरू



बीड (दिव्य न्युज):- बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या दिशेने प्रक्रिया वेगाने सुरू झाली असून काल दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची आज छानणी करण्यात आली. नगराध्यक्ष पदासाठी यंदा अनुसूचित जाती महिला या प्रवर्गासाठी आरक्षण लागू असल्याने मोठी स्पर्धा पाहायला मिळाली. एकूण ४७ इच्छुक उमेदवारांनी नगराध्यक्ष पदासाठी आपला अर्ज दाखल केला होता. आज झालेल्या छानणी प्रक्रियेत यापैकी ४ अर्जात ▶▶ पान २ वर

## प्रभाग क्रं. ८ अन् १७ मध्ये आमेरआण्णा राहणार गेमचेंजर

### नगरसेवक पदाच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामांमुळे ते ज्यांच्या बाजुने राहतील त्यांचा विजय निश्चित







बीड, (दिव्य न्युज):- आज छाननीचा दिवस... नगर पालिका निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पदासाठी ४३ अर्ज आणि नगरसेवक पदाकरीता तब्बल ७७४ उमेदवारी अर्ज आले होते. आज अनेकांचे अर्ज बाद ही करण्यात आले. तर अनेकांचे अर्ज हे वैध राहिल्याने आता उद्यापासून नोंदणीकृत पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार जोमात सुरू राहणार आहे. प्रभाग क्रं.८ आणि १७ मध्ये जोरदार लढत पहायला मिळणार असुन यामध्ये अनेक मात्तबरांची प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे. या प्रभागातुन ▶▶ पान २ वर

## शेख अमर जैनोद्दीन यांनी दिला आपल्या असंघटीत कामगार विभागाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाचा राजीनामा

### पक्षाचे अध्यक्ष खा.सुनिल तटकरे यांना पाठविला राजीनामापत्र



बीड, (दिव्य न्युज):- सध्या नगर पालिका निवडणुकीचे घमासान सुरू असुन आज छाननीचा दिवस होता. उद्या पासून उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिवस असून येणाऱ्या दोन ते तीन दिवसात सर्व चित्र स्पष्ट होणार आहे अशातच राष्ट्रवादीकाँग्रेस अजित पवार गटाला मोठा धक्का बसला असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी असंघटीत कामगार विभागाच्या प्रदेश उपाध्यक्ष असलेले माजी नगरसेवक शेख अमर यानी आपल्या उपाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. ते मागील काही वर्षापासून या ▶▶ पान २ वर



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
महाराष्ट्र राज्य
शेख अमर जैनुद्दीन
दिनांक. १८/११/२०२५
प्रति,
1) मा. खा. सुनिलजी तटकरे साहेब,
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट,
2) मनोजजी व्यवहारे साहेब
प्रदेश अध्यक्ष असंघटित कामगार विभाग
महाराष्ट्र राज्य
विषय :- मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- असंघटितकामगार विभाग (अजित पवार गट) प्रदेश उपध्यक्ष पदाचा राजीनामा देत असले बाबत.
महोदय,
उपरोक्त विषयी विनंती की, मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) या पक्षाचा असंघटित कामगार विभाग प्रदेश उपध्यक्ष पदाचा राजीनामा आपल्याकडे सुपुर्द करत आहेत.तरी पक्षाने माझ्यावर टाकलेली जबाबदारीच्या माध्यमातुन मी पक्षाची विचारधारा तळागळातील कार्यकर्त्यापर्यंत निष्ठेने व प्रामाणिक पणे पोहचवण्याचा प्रयत्न केला. पक्षाने टाकलेल्या विश्वासाबदल मी सर्व वरिष्ठ नेतेमंडळीचे मनस्वी आभार मानतो. आपण केलेल्या सहकार्याबदल धन्यवाद...
आपला

# अस काय घडलं बीडमध्ये?

# अंबाजोगाई नगर पालिकेत भाजपचे कमळ, घड्याळचे चिन्हच गायब

बीड, (दिव्य न्युज):- अंबाजोगाई नगरपालिकेत राजकिशोर मोदी आणि नंदकिशोर मुंदडा यांनी पक्ष आणि चिन्हाला दुय्यम मानत स्थानिक आघाडीला प्राधान्य देणारा वेगळाच पॅटर्न अवलंबला आहे.या रणनीतीमुळे नगरपालिकेचे राजकारण अधिक स्थानिक समीकरणांवर आधारित होत असून पारंपरिक पक्षराजकारणाला मोठं आव्हान निर्माण झालं आहे.या निर्णयामुळे अंबाजोगाईतील निवडणूक-समिकरणांमध्ये नवीन बदल दिसत असून विरोधी गटांमध्ये चांगलाच खळबळ माजली आहे.

बीड जिल्ह्यातील सहा नगर पालिकांच्या निवडणुकीची प्रक्रीया सुरु असून सोमवारी उमेदवारी अर्ज आणि सोबत पक्षांचे एबी फॉर्म दाखल करण्याची मुदत संपली. मात्र, महायुतील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद असलेल्या शहरात आणि या मतदार संघाचे आमदार भाजपचे असतानाही या नगर पालिकेच्या निवडणुकीत भाजपचे कमळ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ चिन्हच नाही. विशेष म्हणजे येथील निवडणुक महायुतीतीमधीलच राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपच्या दोन मातब्बर नेत्यांमध्ये होत आहे.

अंबाजोगाईत राष्ट्रवादी काँग्रेसचे राजकिशोर मोदी आणि भाजपचे नंदकिशोर मुंदडा रिंगणात उतरले असले तरी दोघांनीही आघाड्याचा पर्याय निवडला आहे. दुसरी महत्वाची बाब म्हणजे या नगर पालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एकत्र आले आहेत. बीड जिल्ह्यात बीडसह अंबाजोगाई, परळी, धारुर, माजलगाव आणि गेवराई या सहा नगर पालिकांच्या निवडणुकीसाठी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रीया संपली.परळीत भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस सोबत युती केली आहे. तर, माजलगाव,




धारुर, बीड आणि गेवराईत हेच दोन्ही मित्रपक्ष आमने सामने आहेत. अंबाजोगाईतही राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपचे नेते नगराध्यक्षपदासाठी आमने - सामने असले तरी दोघांनीही आपापल्या पक्षांचे चिन्ह बाजूला ठेवले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष राजकीशोर मोदी यांनी महाविकास आघाडी केली असून भाजपच्या नंदकिशोर मुंदडा यांनी परिवर्तन आघाडीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

अंबाजोगाई नगर पालिकेवर राजकिशोर मोदी यांची २५ वर्षांपासून सत्ता आहे. १५ वर्षे ते स्वत: तर १० वर्षे त्यांच्या भावजय नगराध्यक्ष होत्या. सुरुवातीला काँग्रेसमध्ये असलेले राजकिशोर मोदी आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहेत. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार व अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष पृथवीराज साठे यांना सोबत घेण्यासाठी आघाडीचा पर्याय निवडला आहे.तर, दुसरीकडे भाजपच्या आमदार नमिता मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा यावेळी खुद्द रिंगणात उतरले असले तरी त्यांनीही मुस्लिम मतांची बेगमी जुळविण्यासाठी चिन्ह दुर केले आहे. त्यांच्या पत्नी दिवंगत डॉ. विमल पाच वेळा आमदार तर सुन नमिता मुंदडा दुसऱ्यांदा आमदार आहेत. आमदार मुंदडांच्या विजयात नंदकिशोर मुंदडा यांचा कायमच मोठा वाटा राहीलेला आहे.

दरम्यान, अंबाजोगाईत मोदी - मुंदडा एकमेकांचे कट्टर राजकिय विरोधक मानले जातात. मात्र, आता या दोघांनीही विजयाचे गणित जुळवण्यासाठी आपापल्या पक्षांचे चिन्ह बाजूला ठेवले आहे. दोघांच्याही पक्षांनी त्यांना आघाड्यांना मान्यता दिल्याने या नेत्यांवरील पक्षाचा विश्वासही यातून दिसतो.

पान १ वरून

## अलहुदा उर्दू हायस्कूल,

वाजता कौन्सेलर्स, शिक्षक आणि व्यवस्थापनातील पदाधिकारी यांची विशेष बैठक झाली. या बैठकीत दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांबाबत करण्यात आलेले निरीक्षण, वर्तन, शैक्षणिक कल, मानसिक बाजू आणि बौद्धिक गुणवत्तेचा सविस्तर अहवाल सादर करण्यात आला. ही बैठक भविष्यातील शैक्षणिक धोरण आणि नियोजनासाठी अत्यंत महत्वाची ठरली.कार्यक्रमात नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी बीडचे पदाधिकारी सय्यद शफीक हाशमी, सय्यद मजहर कादरी, काझी मुजाहिद सिद्दीकी आणि जावेद अली खान उपस्थित होते व त्यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक डॉ. सिराज खान यांनी मरकज़ी तालीमी बोर्ड महाराष्ट्रचे सचिव सय्यद शरीफ तसेच विख्यात कौन्सेलर शेख मोहम्मद नजमुद्दीन यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. तसेच नूर सोसायटीचे नव्याने निवडलेले सचिव नसिर अहमद खान यांनी तीन दिवस केलेल्या उत्कृष्ट निवास, भोजन आणि राहण्याच्या सर्व व्यवस्थांचे विशेष अभिनंदन केले. सर्व कौन्सेलर्स, पदाधिकारी, मान्यवर आणि सहकाऱ्यांचे आभार मानताना त्यांनी सांगितले की, ही टेस्ट विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.कार्यक्रमाच्या यशात शाळेचे शिक्षक शेख मोईजोद्दीन, सय्यद रहबर, मोहम्मद रफीक, शेख अब्दुल हमीद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी शेख मसूद, यूनूस खान आणि इतर स्टाफ सदस्यांनी परिश्रमपूर्वक सहकार्य केले.

## तिकीट न मिळाल्याच्या

बाळासाहेब ठाकरे यांच्या काळात सामान्य माणूस आमदार, खासदार, मंत्री होऊ शकत होता. पण आजची शिवसेना ही निष्ठावंतांना न्याय देणारी शिवसेना नाही आम्ही बाळासाहेबांच्या विचारांचे खरे शिवसैनिक आहोत. परंतु आता न्याय मिळत नसल्याने शिवसेना सोडण्याची वेळ आली आहे. प्रभाग क्रमांक १३ मधील कार्यकर्त्यांच्या विनंतीनुसार लवकरच दुसर्या पक्षात प्रवेश करणार असून दोन दिवसांत बैठक घेऊन औपचारिक घोषणा केली जाईल, अशी माहिती रतन गुजर यांच्याकडून पत्रकाद्वारे मिळाली आहे.

## बहुजनांच्या मान-सन्मान

बोंब ठोकून केवळ गप्पाचं मारल्या गेल्या. त्यामुळेच आजच्या घडीला शहरातील सर्व सामान्य नागरिकांना विविध प्रश्नांशी नित्य झुंज देण्याची पाळी आली आहे. समस्या मुक्त शहर करुन स्वच्छ आणि सुंदर बीड करण्यासाठी सामान्य नागरिकाने पुढे येण्याची गरज आहे. हाच विचार उराशी बाळगून सामान्य कुटुंबातील सुषमा राजू जोगदंड शहराच्या विकासाठी निवडणुकीच्या मैदानात उतरल्या आहे. रविवारी (दि.१६) निवडणुक निर्णय अधिकारी कविता जाधव यांच्याकडे त्यांनी नगराध्यक्षपदाचा उमेदवारी अर्ज सुर्पूद केला. यावेळी पत्रकार राजू जोगदंड, बहुजन मुक्ती पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष भीमराव कुट्टे यांची उपस्थिती होती.

दरम्यान आत्ता वेळ आली आहे, प्रस्थापीतांना धडा शिकविण्याची विकासाच्या नावाने पोकळ गप्पा ठोकणार्यांना शहराचा विकास आणि नागरिकांचे मुलभूत प्रश्नांची सोडवणूक करुन दाखविण्याची शहरातील प्रत्येक नागरिकांच्या व बहुजन समाजाच्या अस्मितेची आणि मान-सन्मान व स्वभिमानाची लढाई जिंकण्याची तर चला मग एकच निर्धार करण्याची बीड पालिकेचा कारभार पारदर्शक करण्यासाठी सुषमाताई राजू जोगदंड यांना नगराध्यक्षपदी काम करण्याची एकवेळ संधी द्यावी असे आवाहन बहुजन मुक्ती पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष भीमराव कुट्टे यांनी केले आहे.

पान १ वरून

## बीडमध्ये सामाजिक

जिल्ह्यातील सर्वात मोठ्या बीड नगर पालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांची निवड करताना सर्वच पक्षांनी सामाजिक आणि जातीय समिकरणे मांडत नगराध्यक्षपदांचे उमेदवार निवडले. सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि भाजपने एकाचढ एक उमेदवार रिंगणात उतरविले आहेत. एमआयएमसह अपक्षही रिंगणात आहेत.

बीडचे नगराध्यक्षपद अनुसुचित जाती महिलेसाठी राखीव आहे. तरीही इतर समाज सोबत येतील, असे गणिते मांडत उमेदवारांची निवड करण्यात आली. मागच्या निवडणुकीत जनतेतून नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांनी बाजी मारली होती. मात्र, नगरसेवकांचे बहुमत त्यांना जिंकता आले नव्हते. पहिल्याच निवडणुकीत मागच्या वेळी एमआयएमनेही चांगले यश मिळविले. मात्र, निकालापासूनच पक्षाला फाटाफुटीची बाधा निर्माण झाली.

याच पक्षातील काही नगरसेवकांना गळाला लावून आमदार संदीप क्षीरसागर यांच्या तत्कालिन काकू - नाना आघाडीने उपनगराध्यक्षपद मिळविले. दरम्यान, यावेळची निवडणुक आणखीच रंगतदार होत आहे. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच भाजपकडून सर्व उमेदवार रिंगणात आहेत. शहराचे सामाजिक आणि जातीय मतदारांच्या गणितानुसार उमेदवारांच्या निवडी तिनही पक्षाने केल्या आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने नगर पालिकेत सभापती व नगरसेवक पदाचा अनुभव असलेल्या स्मीता वाघमारे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांचे पती विष्णू वाघमारे २० वर्षे आणि त्या स्वत: १० वर्षे नगरसेवक राहीलेल्या आहेत. सर्वच घटकांत उठबस आणि मृदु स्वभाव ही त्यांची जमेची बाजू आहे. त्यांनी सभापती म्हणूनही काम केलेले आहे.तर, राष्ट्रवादी काँग्रेसने निवृत्त महसूल अधिकारी प्रेमलता पारवे यांना रिंगणात उतरविले आहे. त्यांचे वडिल मनोहर वंजारे दलित मित्र होते. तर, जावई पत्रकार मुजिब शेख यांचा मुस्लिम समाजात चांगला राबता आहे. असे दुहेरी समिकरण डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांना उमेदवारी दिली आहे. ऐनवेळी रिंगणात उतरलेल्या भाजपने डॉक्टर महिलेला उमेदवारी दिली आहे.

केज तालुक्यातील मुळ रहिवाशी पण बीडला अनेक वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रात असलेले घुमरे दाम्पत्यापैकी डॉ. ज्योती घुंबरे बधीरीकरण तज्ज्ञ तर पती डॉ. रवींद्र घुंबरे- नाक - घसा तज्ज्ञ आहेत. डॉ. ज्योती घुंबरे यांना रिंगणात उतरविताना भाजपने उच्चशिक्षीत व चर्मकार असे दुहेरी गणित आखले आहे. एमआयएमनेही मुस्लिम - दलित काँबीनेशन जुळविले आहे. आता, मतदारांना कोणता उमेदवार आवडतो आणि कोणता पक्ष भावतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## बीड नगराध्यक्ष

त्रुटी आढळल्याने ते बाद करण्यात आले असून ४३ अर्ज वैध ठरविण्यात आले आहेत. त्यामुळे नगराध्यक्ष पदासाठीची लढत आणखी रोचक होण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. दरम्यान, बीड शहरात एकूण २६ प्रभाग असून नगरसेवक पदासाठी कालपर्यंत ७७४ अर्ज दाखल झाले होते. या अर्जांची छाननी प्रक्रिया सध्या सुरू आहे. प्रभागनिहाय अर्जांची संख्या मोठी असल्याने उमेदवारांची धडपड, पक्षांतील चर्चा आणि स्थानिक पातळीवरील गणिते आज दिवसभर दिसून आली. उमेदवारांची छाननी पूर्ण झाल्यानंतर उद्या अपात्र अर्जांविरोधात आक्षेप निवारणाची प्रक्रिया होणार आहे. अंतिम यादी जाहीर झाल्यानंतर शहरातील निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे. बीड नगरपरिषद निवडणूक २०२५ चा तपशीलवार रंगतदार सामना आता आणखी चुरशीचा होण्याची चिन्हे दिसत आहेत. शहरातील सर्वच राजकीय पक्ष, उमेदवार आणि कार्यकर्ते यात उत्साहाने सहभागी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत - २१ नोव्हेंबर २०२५, आक्षेप असलेल्या ठिकाणी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत-२५ नोव्हेंबर २०२५, निवडणूक चिन्ह व उमेदवारांची अंतिम यादी-२६ नोव्हेंबर २०२५

## प्रभाग क्रं. ८ अन् १७ मध्ये

यापुर्वी आमेर आण्णा हे नगरसेवक म्हणुन राहिलेले आहेत. त्यांच्या कार्यकाळात या प्रभाग त्यांनी अनेक विकास कामे केलेली आहेत. तसेच या प्रभागात त्यांना मानणारा मोठा वर्ग असुन मोठ्या प्रमाणात मित्र परिवार ही याच प्रभागात आहे. या दोन्ही प्रभागात आमेर आण्णा हे गेमचेंजर राहणार आहेत. ते ज्यांच्या बाजुने राहतील त्यांचा विजय निश्चित राहिल अशी परिस्थिती या प्रभागात निर्माण झाली आहे. या निवडणुकीत आमेर आण्णा हे निवडणुकीच्या रिंगणापासून दुर आहेत पण त्यांची ताकद या प्रभागात मोठ्या प्रमाणात असल्याने ते ज्या उमेदवाराच्या बाजुने राहतील त्यांचाच विजय निश्चित मानला जात आहे. येणाऱ्या एक ते दोन दिवसात ते आपल्या समर्थकांची बैठक घेवून आपण कोणाच्या पाठीशी उभा राहणे कोणाला समर्थन द्यावे असा निर्णय तो घेणार असुन आपण कोणाचे गणित बिघडवीतील आणि कोणाचे गणित चांगले करतेल याकडे आता प्रभागातील मतदारांचे लक्ष लागून आहे.

## शेख अमर जैनोद्दीन

पदावर राहुन असंघटीत कामगारांना न्याय मिळवून देत होते. मोठ्या प्रमाणात त्यांनी कामगारांचा गट तयारी केला होता. आज अचानक रित्या त्यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे व प्रदेश कामगार विभागाचे प्रदेशाध्यक्ष मनोज व्यवहारे यांना आपला उपाध्यक्ष पदाचा राजीनामा पाठविला आहे. राजीनामापत्रात म्हंटले आहे की पक्षाने माझ्यावर टाकलेल्या जवाबदारीच्या माध्यमातुन मी पक्षाची विचारधारा तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत निष्ठेने व प्रामाणिकपणे पोहंचविण्याचा प्रयत्न केला. पक्षाने टाकलेल्या विश्वासाबद्दल मी सर्व वरिष्ठ नेते मंडळीचे मनस्वी आभार मानतो आणि आपण केलेल्या सहकार्याबद्दल आपले धन्यवाद करतो असे म्हणत त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे ते कोणत्या कारणामुळे याचे कारण मात्र अस्पष्ट आहे.

# चार दिवसांत प्रचार कसा करायचा? नवख्या, अपक्षांची होणार धावपळ

## चिन्हासाठी आठवड्याची प्रतिक्षा नंतर पायाला भिंगरी लावू वार्डा वार्डात फिरावे लागणार




बीड : नगरपालिका निवडणुकीसाठी सोमवारी उमेदवारांनी इच्छुक नामनिर्देशनपत्र दाखल केले. राजकीय पक्षांकडूनही ऐनवेळी उमेदवारी जाहीर झाली. काहींनी उमेदवारी मिळो ना मिळो, लढायची तयारी केल्याने वार्डामध्ये संपर्काच्या दोन फेऱ्याही पूर्ण केल्या. परंतु नवखे आणि अपक्ष उमेदवारांना 'मात्र तारेवरची कसरत करावी लागणार आहे. प्रचारासाठी मिळणाऱ्या चार आठवड्याचा दिवसात पायाला भिंगरी लावून फिरावे लागणार आहे. राजकीय पक्षांच्या उमेदवारांची निम्मी ओळख पक्षाचे चिन्हच ठरते. परंतु अपक्ष उमेदवारांना चिन्ह मिळण्यास कालावधी लागणार आहे. त्यामुळे २६ नोव्हेंबरपर्यंत करायचे काय? असा प्रश्न या उमेदवारांपुढे आहे. अनेकजण संभाव्य चिन्ह सांगत स्वतःच्या नावाचा प्रचार करीत मतदारांशी संपर्क करीत आहेत.

### चिन्हासाठी नऊ दिवस वेटिंग

१७ नोव्हेंबर रोजी नामनिर्देशनपत्र दाखल केले. १८ रोजी छाननी आणि वैधरीत्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिद्ध होणार आहे. १९ ते २१ नोव्हेंबरदरम्यान नामनिर्देशनपत्र मागे घेता येणार आहेत. अपील असेल तर त्यासाठी २५ नोव्हेंबरपर्यंत कार्यवाही होणार आहे. तर २६ नोव्हेंबर रोजी निवडणूक चिन्ह नेमून दिले जाणार व उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध होणार आहे. या तारखेपर्यंत अपक्ष उमेदवारांना चिन्हाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### एका प्रभागात ६ ते ८ हजार मतदार

चिन्ह मिळाल्यानंतर चार दिवसात संपूर्ण वार्ड प्रचारासाठी पिंजून काढावा लागणार आहे. वार्डाची मतदारांची संख्या आणि भौगोलिक आकारामुळे अपक्ष उमेदवारांची गोची होणार आहे, हे मात्र निश्चित आहे. शहरातील एका प्रभागामध्ये ६ ते ८ हजारापर्यंत मतदार आहेत. चार दिवसात ३ ते ४ हजार मतदारांशी संपर्क करण्याचे आव्हान नवखे, अपक्ष उमेदवारांपुढे राहणार आहे.

# अलहुदा उर्दू हायस्कूल, बीडमध्ये एप्टीट्यूड टेस्ट व विद्यार्थी पालक यांना मार्गदर्शन

## तज्ञांच्या दोन दिवसीय मार्गदर्शनातून विद्यार्थी व पालक लाभान्वित

बीड, (दिव्य न्युज):- नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी, बीड द्वारा संचलित वतीने अलहुदा उर्दू हायस्कूल, बीड येथे दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मरकज़ी तालीमी बोर्ड महाराष्ट्र, यांच्या संयुक्त विद्यमाने १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी दोन दिवसीय एप्टीट्यूड टेस्ट तसेच समग्र कौन्सेलिंग कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या महत्वाच्या शैक्षणिक उपक्रमासाठी बाहेरील जिल्ह्यांतून आलेल्या चार सदस्यीय तज्ज्ञ कौन्सेलरांच्या टीमने विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक प्रवासाबाबत मार्गदर्शन केले.

कौन्सेलिंग टीममध्ये शेख जामील अहमद (औरंगाबाद), अमीर खान (परभणी), मोहम्मद अकबर आणि प्रा.नजम फारुकी (परभणी) यांचा समावेश होता. ही टीम विशेषरित्या याच उद्देशाने बीडला दाखल झाली होती आणि दोन दिवस विद्यार्थ्यांचा टेस्ट, परफॉर्मन्स, क्षमता व कलानुसार सखोल आढावा घेतला.टेस्टचे




निकाल व विश्लेषण पूर्ण झाल्यानंतर रविवारी विद्यार्थ्यांकरिता तसेच त्यांच्या पालकांसाठी सविस्तर कौन्सेलिंग सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पातळी, नैसर्गिक क्षमता, कल आणि भविष्यकाळातील योग्य दिशांबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन देण्यात आले.यानंतर दुपारी ३

▶▶ पान २ वर

# वडवणी-थेटेगव्हान रस्ता म्हणजे मरणाला आवतन

वडवणी, (दिव्य न्युज):-वडवणी थेटेगव्हाण रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. वडवणी शहरातील चिंचावन्न रोड पासून ते थेट थेटेगव्हाण गावापर्यंत या मार्गावरुन वाहन चालविताना जीव मुठीत घेऊन चालावे लागते. वडवणी शहरापासून रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असल्याने वाहनचालक आणि रहिवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावरील खड्डे टाळण्याच्या प्रयत्नात चारचाकी वाहने आणी दुचाकी याच्यात अपघात होतात., यात दुचाकीस्वार गंभीर जखमी होत आहेत.

डांबरी रस्त्यावर पडलेल्या मोठ्या प्रमाणातील खड्ड्यांमुळे येथे नेहमीच अपघातांची मालीका घडत असते. रस्त्याच्या या दुरावस्थेमुळे अनेकांना आपल्या प्राणाला मुकावे लागले आहे, तर



काहींना मोठी इजा देखील झाली आहे. त्यामुळे या रस्त्यावरुन प्रवास करणे म्हणजे मरणाला आवतन देण्यासारखे ठरले आहे. रस्त्यांची दुरावस्था, वारंवार होणारे अपघात यांकडे प्रशासनाचे कमालीचे दूर्लक्ष असून, प्रशासनाच्या या उदासीन वृत्तीने नागरीक हवालदील झाले आहेत.

# वडवणी येथील मातोश्री हॉटेलचे मालक दत्ता अलगट यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन

वडवणी, (दिव्य न्युज):- वडवणी येथील प्रसिद्ध मातोश्री हॉटेलचे मालक दत्ता शेठ अलगट यांचे अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच परिसरात शोककळा पसरली असून, ग्रामस्थांमध्ये, जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. दत्ता अलगट हे



गेल्या अनेक वर्षांपासून मातोश्री हॉटेलच्या माध्यमातून प्रवासी व ग्रामस्थांची सेवा करत होते. त्यांचा हसतमुख आणि मनमिळाऊ स्वभाव तसेच समाजकार्यातील सहभाग यामुळे ते सर्वांच्या मनात विशेष स्थान निर्माण करून होते.

त्यांच्या निधनाने वडवणी परिसरातील व्यापारी वर्ग, मित्रपरिवार व समाजात शोककळा पसरली आहे. अंत्यसंस्कार वडवणी येथे सकाळी ८ वाजता पार पडणार असल्याचे नातेवाईकांकडून कळते.भावपूर्ण श्रद्धांजली - दत्ता शेठ अलगट यांच्या आत्म्यास शांती लाभो. अलगट कुटुंबीयांच्या दुःखात दैनिक दिव्य वार्ता परिवार सहभागी आहे

# बीड नगर परिषदेवर राष्ट्रवादीची घड्याळ बसविन्यासाठी पारवे ताई, अशफाक इनामदार आणि सय्यद नदीम ला विजय करा : अयाज कागजी

बीड, (दिव्य न्युज):- संपूर्ण राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लागल्या आहे याच पार्शभूमी वर बीड नगर परिषद ची निवडणूक लागली आहे अजित दादा गटातर्फे महाराष्ट्र प्रदेश अमर सिंह पंडित यांचा मार्गदर्शन खाली हे निवडणूक लढविली जात आहे, नगरध्यक्ष हे अनुसूचित जाती च्या महिला साठी राखीव आहे या पदासाठी प्रेमलात ताई पारवे यांना उमेदवारी देण्यात आली आहे, तसेच प्रभाग १८ मध्ये अशफाख इनामदार आणि सय्यद नदीम यांना उमेदवारी देण्यात आली आहे, बीड नगर परिषद वर राष्ट्रवादी अजित पवार गटाची घडी बस्विनीया साठी राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे सर्व उमेदवार ना विजय करा असे अहवान शिक्षक भारती चे जिल्हा अध्यक्ष अयाज कागजी यांनी केले आहे







# बहुजनांच्या मान-सन्मान-स्वाभिमानासाठी सुषमा राजू जोगदंड निवडणुकीच्या मैदानात

## बीड पालिकेच्या अध्यक्षपदासाठी सुषमाताईंनी दाखल केला उमेदवारी अर्ज




बीड (दिव्य न्युज):- फुफाट्यात आणि घाणीच्या साम्राज्यात सापडलेले बीड शहराचा चेहरा-मोहरा बदलण्यासाठी आणि बहुजनांचा मान-सन्मान-स्वाभिमान राखण्यासाठी पत्रकार राजू जोगदंड यांच्या पत्नी सुषमा राजू जोगदंड ह्या होऊ घातलेल्या बीड नगर परिषदेच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या असून बीड पालिकेच्या अध्यक्षपदासाठी त्यांनी रविवारी (दि.१६) आपला उमेदवारी अर्ज अगदी साध्या पद्धतीने दाखल केला.

गेल्या अनेक वर्षापासून बीड शहरातील विविध भागांमध्ये समस्यांचा ढिगारा निर्माण झाला आहे. त्या सोडविण्यासाठी आजवर विकासाच्या नावाने

▶▶ पान २ वर

# तिकीट न मिळाल्याच्या नाराजीमुळे रतन गुजर शिवसेनेला अखेरचा जयमहाराष्ट्र करणार !

## दोन दिवसात ठरवणार नवीन वाटचाल



बीड (दिव्य न्युज):- शिवसेनेत ३५ वर्षे अविरत सेवा करूनही नगर परिषदेचे तिकीट न मिळाल्याने प्रभाग क्रमांक १३ मधील ज्येष्ठ शिवसैनिक रतन गुजर यांनी पक्षावर नाराजी व्यक्त केली आहे. मशाल चिन्हावर उमेदवारीची मागणी करण्यात आली होती, परंतु शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख यांनी स्थानिक आमदारांच्या दबावाखाली कार्यकर्त्यांना सरेंडर केले असल्याचे आरोप रतन गुजर यांनी पत्रकाद्वारे केला असून उध्दव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना सोडणार असून दोन दिवसात नवीन वाटचाल ठरवणार असल्याचे रतन गुजर यांनी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

दिलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, नगर परिषद निवडणुकीच्या जागा वाटपात अवघ्या चार जागा शिवसेनेला मिळाल्या असून त्यापैकी दोन उमेदवारांनी सहा महिन्यांपूर्वीच पक्ष प्रवेश केला होता. शिवाय, शेवटच्या क्षणी पक्षात दाखल झालेल्या व्यक्तीलाही मशाल चिन्हावर उमेदवारी मिळाली असून, तोही स्थानिक आमदाराचा जवळचा मानला जातो. त्यामुळे कायमस्वरूपी समर्पित असलेल्या कार्यकर्त्यांची उपेक्षा झाली आहे.

▶▶ पान २ वर

## नवाब मलिकांच्या अडचणी वाढल्या

# दाऊदच्या मालमत्तांसंबंधित मनी लॉड्रिंग प्रकरणात आरोप निश्चित

**मुंबई, (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांना अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या मालमत्तांशी संबंधित कथित मनी लॉड्रिंग प्रकरणात विशेष न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. या प्रकरणात मलिक यांच्यासह इतर आरोपींवर आरोप निश्चित करण्यात आले असून, या प्रकरणी डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून दैनंदिन सुनावणीला सुरुवात होणार आहे.**

ईडीने दाखल केलेल्या तक्रारीनुसार, दाऊद इब्राहिमची बहीण हसीना पारकर, तिचा साथीदार सलीम पटेल, १९९३ च्या मुंबई स्फोटातील आरोपी सरदार खान आणि नवाब मलिक यांनी गोवावाला कम्पाउंडमधील मुनीरा प्लंबर यांच्या मालकीची तीन एकर जमीन कट रचून बळकावली, असा आरोप आहे. या व्यवहारातून मिळालेला निधी िलिशशवी ष लीळाश म्हणून वापरला गेल्याचे ईडीचे म्हणणे आहे.

मलिक यांना या प्रकरणात २०२२ मध्ये अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्यांना उच्च न्यायालयातून जामीन मिळाला असून ते सध्या जामिनावर आहेत. या प्रकरणातील सुनावणीसाठी आज दुपारी ३ वाजता विशेष न्यायालयात हजेरी लावण्यात आली. या वेळी मलिक यांच्या वकिलांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेचा उल्लेख करत, ईडीकडून मागितलेल्या कागदपत्रे मिळेपर्यंत आरोप निश्चित प्रक्रिया पुढे ढकलण्याची विनंती केली.तथापि, विशेष न्यायाधीश एस. आर. नावंदर यांनी ही मागणी फेटाळून लावली. न्यायालयाने स्पष्ट केले की, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कोणत्याही प्रकरणात चार आठवड्यांच्या आत आरोप निश्चित करणे आवश्यक आहे. न्यायालयाने एएसजीद्वारे उच्च न्यायालयात दिलेल्या निवेदनावर नाराजी व्यक्त केली आणि खंडपीठाच्या वतीने कोणीही आधीच कोणतेही विधान करू शकत नाही, अशी टिप्पणी नोंदवली.



न्यायालयाने पुरावे आणि दस्तऐवजांचा अभ्यास करून, मलिक आणि इतर आरोपींविरुद्धच्या आरोपांना प्राथमिकदृष्ट्या आधार आहे, असे नमूद केले. त्यामुळे या प्रकरणात नियमित सुनावणीला डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरुवात होणार आहे. या निर्णयामुळे नवाब मलिक यांच्या अडचणीत वाढ झाली असून, मनी लॉड्रिंग प्रकरणाचा न्यायालयीन लढा आता निर्णायक टप्प्यात प्रवेश करीत आहे.